आरोग्य सेवक पुरष गट-क संवर्गातील
कर्मचा-यांच्या सर्वसाधारण बदल्या व
नेमणूका करणेबाबत.
**(आपसी बदली)**

जिल्हा परिषद अहमदनगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रं.आरोग्य/आस्था-३/०५०२३/२३१/२०२३
अहमदनगर दि.२९/०५/२०२३

वाचा - १. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं. जिपब-४१४/प्र.क्र.-११२/आस्था- १४ दि. १५/०५/२०१४.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडिल शासन शुध्दीपत्रक क्रं.जिपब-४१४/प्र.क्रं.११२/आस्था-१४,दि. ०२/०७/२०१४
३. ग्रामविकास विभागाकडील शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१६/प्र.क्र.१३६/आस्था-१४ दि.०२/०१/२०१७
४. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रं. जिपब-८१७/प्र.क्र.२२८/आस्था-१४ दि. ०७/०३/२०१९.
५. ग्रामविकास विभागाकडील पत्र क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२२६/आस्था-१४, दि. ११/०५/२०२२
७. सर्वसाधारण बदल्यांचे इतिवृत्त दि. १३/०५/२०२३.

शासनाकडील संदर्भ क्रमांक १ च्या निर्णयामध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार, संदर्भ क्र.२ ते ४ अन्वयेचे शुध्दीपत्रक व तदअनुषंगिक निर्णयातील तरतुदींनुसार, तसेच संदर्भ क्र. ५ च्या शासन निर्णयान्वये व संदर्भ क्र. ६ च्या पत्रान्वये बदल्या करण्यास दिलेल्या परवानगीनुसार जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागाच्या कार्यरत असलेल्या आरोग्य सेवक पुरुष या संवर्गातील कर्मचा-यांच्या समुपदेशनाने त्यांच्या नावा समोरील कराना क्र.४ येथुन रकाना क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या ठिकाणी आपसी विनंती बदलीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव व पदनाम | पदनाम | कार्यरत प्रा.आ.केंद्र तालुका | बदलीने पदस्थापना दिलेले प्रा.आ.केंद्र तालुका | बदलीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.अहिले गणेश धोंडीबा | आरोग्य सेवक पुरुष | उपकेंद्र भेंर्डापूर प्रा.आ.केंद्र पढेगाव ता.श्रीरामपुर | उपकेंद्र मांजरी प्रा.आ.केंद्र मांजरी ता.राहुरी | आपसी |
| | श्री.कंढारे अनिकेत शंकर | आरोग्य सेवक पुरुष | उपकेंद्र मांजरी प्रा.आ.केंद्र मांजरी ता.राहुरी | उपकेंद्र भेंर्डापूर प्रा.आ.केंद्र पढेगाव ता.श्रीरामपुर | |

वरिल कर्मचा-यांचे बदलीची आदेश खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निर्गमित करण्यात येते आहेत.

१. आदेशात नमुद कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेकामी दि.३१/०५/२०२३ रोजी कार्यालयीन वेळेनंतर या स्तरावरुनच कार्यमुक्त करण्यात येत आहे.
२. संदर्भ क्र. १ मधील प्रकरण-१ मुद्दा क्र. ७ नुसार बदली होण्यापुर्वी ज्या ठिकाणी कर्मचारी कार्यरत होते त्या ठिकाणावरुन दिनांक ०१/०६/२०२३ नंतर वेतन व भत्ते अदा करु नयेत अन्यथा संदर्भ क्र. ५ मधील मुद्दा क्र. ९ मध्ये नमुद केलेनुसार पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास,अनुउपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल. तसेच मुद्दा क्र. ८ मध्ये नमुद केलेनुसार बदली ही संपुर्ण

प्रशासकीय बाब असल्याने कोणत्याही कर्मचा-याने राजकीय दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ६ (५) चा भंग केला म्हणून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

३. संबधित कार्यालय प्रमुख यांनी बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांना त्यांचेकडील कार्यभार सोपविणेबाबत पर्यायी व्यवस्था करुन संबंधितांना बदलीच्या ठिकाणी हजर होणेकरीता कार्यमुक्त करावे.

४. सदर बदली विनंतीने झाली असल्याने संबंधीतांना पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय नाही.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या **www.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२३०५२९१००१७३ असा आहे.

स्वाक्षरी XXXX
**(आशिष येरेकर भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

प्रति,

श्री.अहिले गणेश धोंडीबा, आरोग्य सेवक पुरुष, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव, ता.श्रीरामपुर

द्वारा व प्रत - वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव, ता.श्रीरामपुर

प्रति,

श्री.कंढारे अनिकेत शंकर, आरोग्य सेवक पुरुष, प्राथमिक आरोग्य केंद्र मांजरी, ता.राहुरी

द्वारा व प्रत - वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र मांजरी, ता.राहुरी

२/- उपरोक्त बदली झालेल्या कर्मचा-यास बदलीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे व संबंधीताचे वेतन दि. ०१/०६/२०२३ नंतर अदा करु नये, तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर / राहुरी

प्रत - वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र मांजरी, ता.राहुरी, जिल्हा अहमदनगर

प्रत - वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पढेगाव, ता.श्रीरामपुर, जिल्हा अहमदनगर

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर

प्रतः- निवड नस्ती

स्थळ प्रतिवर मा.मु.का.अ.जि.प.अ.नगर यांची स्वाक्षरी असे

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर करिता**